लिहून घेणार :–
खरेदीदार/पक्ष क्र. २

मेसर्स तिरूपती डेव्हलपर्स, भागिदारी संस्था,
(स्थाई आयकर खाते क्र. AAEFT2905K),
ज्याचे कार्यालय एनकेवाय टॉवर, अजनी, नागपूर–४४००१५ येथे असुन यांचे तर्फे अधिकृत भागिदार
(१) श्री. प्रशांत मनोहरराव बोंगीरवार,
वय अं. ४८ वर्षे, धंदा – व्यापार व शेती,
(आधार कार्ड नं. २५६३ १५६५ ३२८७),
राहणार – ११–ए, खरे टाऊन, धन्वंतरी हॉस्पीटल जवळ, धरमपेठ, नागपूर–४४००१०, तालुका व जिल्हा – नागपूर,
(२) श्री. राहुल अरूणराव उपगन्लावार,
वय अं. ४४ वर्षे, धंदा – व्यापार व शेती,
(आधार कार्ड नं. ६७२८ ४९३५ ३७९१)
राहणार – फ्लॅट नं. ३०४, अक्षय हाईट्स, सिमेंट रोड, प्लॉट नं. २०२, शिवाजी नगर, नागपूर–४४००१०, तालुका व जिल्हा – नागपूर.

वरील लिहून देणार/विक्रेता/पक्ष क्रमांक १ व लिहून घेणार/खरेदीदार/पक्ष क्रमांक २या शब्दात पूर्व संदर्भ विरूद्ध नसल्यास, त्यांचे प्रत्येकी वैयक्तीक वारस, वहीवाटदार, कायदेशीर हक्कदार, इस्टेटीचे प्रतिपालक किंवा इस्टेटीतुन ज्यांना फायदा मिळेल असे, कार्यपालक प्रतिनिधी अभी हस्तांकिती असे सर्व अंतर्भूत येतील.

आज दिनांक २०., फेब्रुवारी, २०१९, रोजी लिहून देणार/विक्रेता/पक्ष क्रमांक १, हे, हिंगणा मुक्कामी मे. सबरजिस्ट्रार साहेब, हिंगणा येथे खालीलप्रमाणे शेतजमिनीचे, स्थावर मिळकतीचे कायमचे विक्रीपत्र लिहून घेणार/खरेदीदार/पक्ष क्र. २ यांना लिहून व सही करून देत आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त विक्रीपत्र लिहून देणार/विक्रेता/पक्ष क्रमांक १, यांचे मालकी कब्ज्यात व वहीवाटीत असलेली तहसिल – हिंगणा, जिल्हा – नागपूर, पंचायत समिती, हिंगणा, जिल्हा परिषद नागपूर यांचे तसेच सबरजिस्ट्रार हिंगणा यांच्या हद्दीतील मिळकत ज्याचे वर्णन खालील प्रमाणे आहे –

मिळकतींचे वर्णन :–

खास तुकडी – कोतेवाडा, तहसिल – हिंगणा, जिल्हा – नागपूर, पंचायत समिती हिंगणा, जिल्हा परिषद नागपूर तसेच सबरजिस्ट्रार हिंगणा यांच्या हद्दीतील **मौजा – कोतेवाडा,** तलाठी साझा क्र. ७२ येथील शेतजमीनी ज्यांचा **भूमापन/खसरा/गट क्रमांक १५३/१ व १६१/१,** दोन्ही भूधारणा पद्धती भोगवटदार वर्ग १, अनुक्रमे **आराजी ३.१६ हेक्टर आर व आराजी १.२५ हेक्टर आर,** अनुक्रमे जमा रू. ७ वार्षीक व रू. ४.८१ वार्षीक, खाते क्र. २० हिस्सापुर्ण शेतजमीन यांसी चतु:सीमा –

पुढील पानांवर .....

हगन
११६८ | २०१९
४ | ३२

CLAIM OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 HINGNA
राह दुय्यम निबंधक वर्ग-२, हिंगणा

Scanned with CamScanner

भुमापन/खसरा/गट नं. १५३/१ ची चतु:सिमा –

पूर्वेस	:	नाला,
पश्चिमेस	:	भुमापन/गट/खसरा क्र. १४३ व १६१/१,
उत्तरेस	:	भुमापन/गट/खसरा क्र. १५२,
दक्षिणेस	:	भुमापन/गट/खसरा क्र. १५३/२.

भुमापन/खसरा/गट नं. १६१/१ ची चतु:सिमा –

पूर्वेस	:	भुमापन/गट/खसरा क्र. १५३/१ व १५३/२,
पश्चिमेस	:	भुमापन/गट/खसरा क्र. १६२ व १६३,
उत्तरेस	:	भुमापन/गट/खसरा क्र. १४३,
दक्षिणेस	:	भुमापन/गट/खसरा क्र. १६१/२.

येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक जमीन जल, तृण, काष्ट, पाषाण, निधी, निक्षेप व तदंगभूत वस्तूसहित व जाण्यायेण्याचे वहिवाटीचे हक्कासुध्दा दरोबस्त, सदर मिळकत सोबतच्या नकाशात लाल रंगाने सिमीत केलेली असून सदर नकाशा या विक्रीपत्राचा एक भाग आहे असे समजण्यात यावा.

ज्याअर्थी मौजा – कोतेवाडा, तलाठी साझा क्रमांक ७२, तहसिल – हिंगणा, जिल्हा – नागपूर येथील शेतजमीन, ज्याचा गट/भूमापन क्रमांक १५३/१, आराजी ३.१६ हेक्टर आर, जमा रू. ७ वार्षीक, भूधारणा पद्धती भोगवटदार वर्ग १, ही मिळकत राजस्व अभिलेखाप्रमाणे सुरुवातीला श्री. गोपाळा फकिराजी आष्टनकर यांचे मालकीची असुन ती त्यांचे नांवे राजस्व अभिलेखात दर्ज आहे; आणि

ज्याअर्थी त्याचप्रमाणे मौजा – कोतेवाडा, तलाठी साझा क्रमांक ७२, तहसिल – हिंगणा, जिल्हा – नागपूर येथील शेतजमीन, ज्याचा गट/भूमापन क्रमांक १६१, आराजी ३.७६ हेक्टर आर, जमा रू. १४.४३ वार्षीक, भूधारणा पद्धती भोगवटदार वर्ग १, ही मिळकत राजस्व अभिलेखाप्रमाणे सुरुवातीला (१) श्री. गोपाळा फकिराजी आष्टनकर, (२) श्री. सदाशिव फकिराजी आष्टनकर व (३) श्री. गोविंदा फकिराजी आष्टनकर यांचे संयुक्त मालकीची असुन ती त्यांचे संयुक्त नांवे राजस्व अभिलेखात दर्ज असुन ती त्यांची वडीलोपार्जीत संपत्ती आहे; आणि

ज्याअर्थी दरम्यानच्या काळांत उपरोक्त मौजा – कोतेवाडा, तलाठी साझा क्रमांक ७२, तहसिल – हिंगणा, जिल्हा – नागपूर येथील शेतजमीन, जिचा गट/भूमापन क्रमांक १६१, आराजी ३.७६ हेक्टर आर, जमा रू. १४.४३ वार्षीक, भूधारणा पद्धती भोगवटदार वर्ग १, या मिळकती बाबत (१) श्री. गोपाळा फकिराजी आष्टनकर, (२) श्री. सदाशिव फकिराजी

पुढील पानांवर .....

हगन
११६८/२०१९
५/३२

Scanned with CamScanner

आष्टनकर व (३) श्री. गोविंदा फकिराजी आष्टनकर यांच्यामध्ये आपसी लेखी वाटण्या सन २००३ मध्ये झालेल्या असुन सदरच्या वाटणीपत्रानुसार उपरोक्त संपत्तीपैकी पुर्व–पश्चिम धुरा पाडुन उत्तरेकडील भाग आराजी १.२५ हेक्टर आर, ही मिळकत श्री. गोपाळा फकिराजी आष्टनकर यांना हमेशाकरीता वंशपरंपरागत मालकी हक्काने प्राप्त झालेली असुन याची नोंद राजस्व अभिलेखात फेरफार नोंद क्र. ८२ दिनांक १६–०८–२००३ अन्वये दर्ज आहे. उपरोक्त श्री. गोपाळा फकिराजी आष्टनकर यांचे मिळकतीस आता भुमापन/खसरा/गट क्र. १६१/१, आराजी १.२५ हेक्टर आर, जमा रू. ४.८१ वार्षीक, भूधारणा पद्धती भोगवटदार वर्ग १, खाते क्र. २० असे संबोधण्यात आलेले आहे; आणि

ज्याअर्थी मौजा – कोतेवाडा, राजस्व निरीक्षक मंडळ पारडी, तहसिल व जिल्हा – नागपूर येथील शेतजमीनी, ज्यांचा गट/भूमापन क्रमांक (जुना) ९६/२ व ८३/२–३, अनुक्रमे आराजी ३.६८ एकर म्हणजेच ३.७६ हेक्टर आर व ६.२४ एकर म्हणजेच २.५२ हेक्टर आर, अनुक्रमे जमा रू. ५.७२ वार्षीक व रू. ७ वार्षीक, दोन्ही भूधारणा पद्धती भोगवटदार वर्ग १, हया मिळकती सुरूवातीला श्री. गोपाळा फकीरा आष्टनकर यांच्या मालकीच्या असुन त्या त्यांना सन १९६९ मध्ये श्री. नारायण व त्यांचे भाऊ श्री. निळकंठ, श्री. रामा, श्री. महादेव, श्री. गोविंदा व श्री. सदाशिव यांच्यामध्ये झालेल्या लेखी आपसी वाटण्याद्वारे प्राप्त झालेल्या असुन त्याचा राजस्व मामला क्र. २–अ–६/आर.व्ही. एस–६४/१९७४–७५ दिनांक १०–१२–१९७४ रोजीचे आदेशान्वये प्राप्त झाल्या असुन याची नोंद राजस्व अभिलेखात फेरफार नोंद क्र. २८१ दिनांक १०–१२–१९७४ अन्वये दर्ज आहे; आणि

अशाप्रकारे उपरोक्त श्री. गोपाळा फकिराजी आष्टनकर, लिहून देणार/विक्रेता हे सदर्हू मिळकती ज्यांचा भुमापन/खसरा/गट क्र. १५३/१ व १६१/१, अनुक्रमे आराजी ३.१६ हेक्टर आर व १.२५ हेक्टर आर, अनुक्रमे जमा रू. ७ वार्षीक व रू. ४.८१ वार्षीक, दोन्ही भोगवटदार वर्ग १, खाते क्र. २० या मिळकतीचे एकमेव मालक असुन त्या त्यांचे नांवे राजस्व अभिलेखात दर्ज आहे; आणि

सदरर्हु दोन्ही शेतीची जागा ही लिहून देणार/विक्रेता यांची मालकीची असून सदरहू दोन्ही जमीनी लिहून देणार/विक्रेता यांचे मालकी हक्कात आणि वहिवाटीत आहे व इतर कुणाचाही त्यावर कुठल्याही प्रकारचा हक्क अथवा अधिकार नाही. लिहून देणार/विक्रेता यांना सदर शेतीची जागा कुणालाही विकण्याचा संपूर्ण अधिकार आहे; आणि

दुसरी सोयीची शेतजमीन विकत घेण्यासाठी तसेच कुटुंबाचे हिताकरीता व कौटुंबीक गरजांसाठी रकमेची जरूरी असल्याने सदर्हू दोन्ही मिळकती लिहून देणार/विक्रेता यांनी त्यांचे कौटुंबीक व इतर निकडीच्या कायदेशीर, खऱ्या व योग्य कारणांसाठी आपसी समझौत्याद्वारे लिहून घेणार/खरेदीदार यांना विविध अटी व शर्तीवर विकण्याचे योजीलेले आहे; आणि

पुढील पानांवर .....

हगन
११६८/२०१९
६/३२
SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 PUNCH
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, हिंगणा

Scanned with CamScanner